जावक क्र. 281 /२०२२
उरण वाहतूक शाखा, नवी मुंबई
दिनांकः– १४/०७/२०२२

प्रति,

श्री Continental Warehousing Corporation Private Limited. Khopta

ज्याअर्थी मी अशोक गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उरण वाहतुक शाखा, नवी मुंबई आपणांस याद्वारे समज देतो की, ठाणे जिल्हयामध्ये होत असलेल्या वाहतूक कोंडी संदर्भाने जे.एन.पी.टी. बंदरातुन कंटेनर वाहतूक करणारी वाहने व इतर जड–अवजड वाहने नवी मुंबई हद्दीतुन ठाणे जिल्हयाचे हद्दीत प्रवेश करुन गुजरात तसेच नाशिक दिशेने जात असल्याने ठाणे जिल्हयाचे हद्दीत मोठया प्रमाणात दैनंदिन वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होवुन सदर वाहतूक कोंडीचा सामान्य नागरीकांना त्रास सहन करावा लागतो.

सदर वाहतुक कोंडी संदर्भाने मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी मिटींग घेवुन ठाणे शहराकडे नवी मुंबई मधुन जाणा–या जड अवजड वाहनांना वाहतुकीस सकाळी ०६:०० वा. ते दुपारी १२:०० वा. पर्यंत व सायंकाळी १६:०० वा. ते रात्रौ २३:०० वा. पर्यंत पुर्णतः बंदी करणे आली आहे. तसेच दुपारी १२:०० वा. ते १६:०० वा. पर्यंत व रात्रौ २३:०० वा. ते सकाळी ०६:०० वा. पर्यंत वाहतुकीस मुभा (परवानगी) देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त, वाहतुक, नवी मुंबई यांनी वाहतुक नियंत्रण अधिसूचना निर्गमीत केलेली आहे.

तसेच सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने बंदीच्या वेळेत आपले आस्थापणेकडील (सीएफएस/यार्ड/गॅरेज/गोडाउन/लॉजेस्टीक/ट्रान्सपोर्ट ) जड–अवजड वाहने दि.१४/०७/२०२२ रोजी पासुन पुढील आदेशापर्यंत सकाळी ०६:०० वा. ते दुपारी १२:०० वा. पर्यंत व सायंकाळी १६:०० वा. ते रात्रौ २३:०० वा. पर्यंत आस्थापणेतुन (सीएफएस/यार्ड/गॅरेज/गोडाउन/लॉजेस्टीक /ट्रान्सपोर्ट ) मधुन जड–अवजड वाहने बाहेर पडणार नाहीत किंवा आपण बाहेरून बोलविणार नाहीत तसेच जड–अवजड वाहने रस्त्यावर येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. सदर आपणाकडील जड–अवजड वाहनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास आपणास जबाबदार धरण्यात येईल याची दखल घ्यावी.

पोलीस निरीक्षक वाहतूक शाखा उरण, नवी मुंबई

( अशोक गायकवाड )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
उरण वाहतूक शाखा, नवी मुंबई.